महाराष्ट्रातील भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या भटक्या जमातीतील
मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराला बळकटी देणारा

कृती संशोधन अभ्यास

डॉ. चंद्रकांत पुरी

संशोधन अहवाल प्रकाशन आणि प्रसारण कार्यशाळा

संक्षिप्त वृत्तांत

दिनांक: १८ फेब्रुवारी २०१५

● संशोधन सहाय्य संस्था ●

राजीव गांधी समकालिन अध्ययन केंद्र, मुंबई विद्यापीठ
न्यू एज्युकेशन ग्रुप, नवी दिल्ली,
झेविअर समाज संशोधन संस्था, मुंबई

अहवाल संकलन :विजय वळंजू

● प्रमुख पाहुणे

मा. श्री. भिकुजी इदाते
अध्यक्ष, राष्ट्रीय विमुक्त आणि भटक्या जमाती आयोग,
भारत सरकार, नवी दिल्ली

● विशेष अतिथी

मा. हरीभाऊ राठोड
आमदार,विधान परिषद, महाराष्ट्र

मा. बाळकृष्ण रेणके
माजी अध्यक्ष, राष्ट्रीय विमुक्त आणि भटक्या जमाती आयोग,
भारत सरकार, नवी दिल्ली

मा. प्रो. गौतम गवळी,
संचालक,भारतीय सामाजिक शास्त्र संशोधन परिषद,
पश्चिम विभागीय केंद्र,मुंबई विद्यापीठ

मा. प्रो.आर. शिवप्रसाद,
केंद्रीय विद्यापीठ, हैद्राबाद

मा. व्यंकटेश कृष्णा,
कार्यकारी संचालक, न्यू एज्युकेशन ग्रुप-फायर, नवी दिल्ली

मा. डॉ. अँथनी डायस
संचालक, झेविअर समाज संशोधन संस्था,मुंबई

स्थळ: राजीव गांधी समकालिन अध्ययन केंद्र,
मुंबई विद्यापीठ, कलिना, सांताक्रुज(पुर्व)
मुंबई ४०० ०९८

अ नु क्र म णि का

१. प्रस्तावना..... ३

२. उद्घाटन सत्र..... ४

३. संशोधन अभ्यासाविषयी ६

४. अभ्यासाचा उद्देश ७

५. अभ्यासासाठी निवडल्या गेलेल्या भटक्या जमाती ७

६. भटक्या समुदायांच्या अभ्यासातील प्रमुख निष्कर्ष ९

७. संशोधन अभ्यासाविषयी सन्माननीय सदस्यांची मते..... १०

८. कार्यकर्ते व तज्ज्ञ मान्यवरांचे अभ्यासाविषयी विचार
आणि विकासासाठी सूचना..... .....१५

९. समारोप सत्र १८

१०. कार्यशाळेतील सहभागी प्रतिनिधी २१

संशोधन अहवाल प्रकाशन आणि प्रसारण कार्यशाळा संक्षिप्त वृतांत

- संशोधन:

  डॉ. चंद्रकांत पुरी

- संशोधन सहाय्य संस्था :

  राजीव गांधी समकालिन अध्ययन केंद्र, मुंबई विद्यापीठ

  न्यू एज्युकेशन ग्रुप, नवी दिल्ली

  झेविअर समाज संशोधन संस्था, मुंबई

- कार्यशाळा स्थळ:

  राजीव गांधी समकालीन अध्ययन केंद्र
  मुंबई विद्यापीठ,राजीव गांधी भवन,
  सांताक्रूज (पूर्व), मुंबई ४०० ०९८

- कार्यशाळा दिनांक:

  १८ फेब्रुवारी २०१५

- अहवाल संकलन:

  विजय वळंजू

- अंतर्गत सजावट :

  शब्द प्रकाशन, पनवेल

१ प्रस्तावना

महाराष्ट्रातील भटक्या भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या समुदायातील मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराला बळकटी करण्यासाठी डॉ. चंद्रकांत पुरी, राजीव गांधी समकालिन अध्ययन केंद्र, मुंबई विद्यापीठ, न्यू एज्युकेशन ग्रुप, दिल्ली आणि झेविअर सामाजिक संशोधन संस्था या संस्थेच्या वतीने एक संशोधन अभ्यास केला. हा अभ्यास एप्रिल, २०१४ मध्ये सुरू करण्यात आला होता. जुलै ते ऑगस्ट या कालावधीत यासंदर्भातील आकडेवारी गोळा करण्याचे काम केले गेले तर, या अभ्यासाचा पहिला मसुदा डिसेंबर, २०१४ मध्ये तयार करण्यात आला. या अभ्यासाचे प्रमुख उद्देश हे सोलापूर व लातूर या महाराष्ट्रातील दोन जिल्ह्यांतील ४ तालुक्यातील भटक्या भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या समुदायांच्या अस्तित्त्वाच्या प्रश्नांना समजून घेणे, भटक्या भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या समूहांच्या मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराची स्थितीचे तसेच सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या अधिकाराचे या जिल्ह्यातील निवडक तालुक्यांतील वास्तव तपासणे, तसेच या समूहांच्या सामाजिक, आर्थिक व जीवनाधाराशी संबंधीत स्थितीचे विश्लेषण करणे हे होते.

या संशोधन अहवालाच्या अंतिम मसुद्याचे प्रकाशन आणि प्रसारण करणारी कार्यशाळा दि. १८ फेब्रुवारी २०१५ रोजी राजीव गांधी समकालिन अध्ययन केंद्र, मुंबई विद्यापीठाच्या सभागृहात संपन्न झाली. या कार्यशाळेचे आयोजन राजीव गांधी समकालिन अध्ययन केंद्र, मुंबई विद्यापीठ, न्यू एज्युकेशन ग्रुप, दिल्ली आणि झेविअर्स सामाजिक संशोधन संस्था यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

■■■

२ उद्घाटन सत्र

संशोधन अहवाल प्रकाशन व प्रसारण कार्यशाळेचे उद्घाटन मा. श्री. भिकुजी (दादा) इदाते, अध्यक्ष, राष्ट्रीय भटक्या विमुक्त जमाती आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेत मा. हरीभाऊ राठोड, आमदार, विधान परिषद, महाराष्ट्र, मा.बाळकृष्ण(अण्णा) रेणके, माजी अध्यक्ष, राष्ट्रीय भटक्या विमुक्त जमाती आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली, प्रो. गौतम गवळी, संचालक, भारतीय सामाजिक शास्त्र, संशोधन परिषद, पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई विद्यापीठ, मा. प्रो. आर. शिवप्रसाद, केंद्रीय विद्यापीठ, हैद्राबाद, मा. व्यंकटेश कृष्णा, कार्यकारी संचालक, न्यू एज्युकेशन ग्रुप, नवी दिल्ली, मा. डॉ. अँथनी डायस, संचालक, झेविअर सामाज संशोधन संस्था, मुंबई इत्यादी मान्यवर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहभागी झाले होते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात भटक्या विमुक्त जमातीसोबत काम करणाऱ्या संस्थांचे कार्यकर्ते, विचारवंत व संशोधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यशाळेच्या सुरुवातील सर्व सहभागी सन्मानीय पाहुण्यांची व त्यांच्या कार्याची ओळख मा. व्यंकटेश कृष्णा यांनी सभागृहाला करुन दिली. तसेच न्यू एज्युकेशन ग्रुप या संस्थेच्या कामाचे स्वरुप व त्याची कार्यकक्षेविषयी थोडक्यात मांडणी केली.

निलंगा, लातूर जिल्ह्यांतून आलेल्या गोंधळी समाजाच्या कलाकारांनी करपल्लवी या सांकेतिक भाषेचा वापर करुन सहभागृहातील उपस्थित पाहुण्यांची नाविन्यपूर्ण पध्दतीने ओळख करुन दिली. त्यांच्या या पारंपारिक कौशल्याला सभागृहाने टाळ्या वाजवून उस्फुर्त प्रतिसाद दिला. या नंतर कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व सन्माननीय पाहुण्यांचे डॉ. चंद्रकांत पुरी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. राष्ट्रीय आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल मा. श्री. दादा इदाते यांचा यथोचित सन्मान डॉ. चंद्रकांत पुरी यांच्या हस्ते करण्यात आला.

डॉ. चंद्रकांत पुरी यांनी केलेल्या संशोधन अहवालाचे प्रकाशन मा. श्री. भिकुजी (दादा) इदाते, अध्यक्ष, राष्ट्रीय भटक्या विमुक्त जमाती आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली

यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मनोगत व्यक्त करतांना मा. दादा इदाते म्हणाले की, डॉ. चंद्रकांत पुरी व त्यांच्या टिमने भटक्या भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या समूहांतील मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराच्या स्थितीचे संशोधन करुन वास्तव चित्र समाजाच्या समोर आणण्याचे काम केले आहे, त्याबद्दल त्यांचे सर्व प्रथम अभिनंदन केले पाहीजे.

उद्घाटनपर भाषणात त्यांनी अनेक विषयावर विचार व्यक्त केले. शैक्षणिक स्तरावर होत असलेल्या अशा संशोधनात्मक अभ्यासांतून निती आणि धोरण ठरविण्यास मदत मिळत असते. गोंधळी समाजातील करपल्लवी यासारख्या पारंपारिक वारसा असणारी सांकेतिक भाषा काळानुरुप नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, त्याचे संवर्धन करण्याची गरज आहे. प्रभाकर मांडे यांनी भटक्या समाजातील विविध सांकेतिक भाषांविषयी संशोधन केले आहे. यासर्वांचा मागोवा घेण्याची गरज आहे. भटक्या जमातीतील मुलांच्या शैक्षणिक स्थितीचे जसे संशोधन करण्यात आले तसेच 'विमुक्त जाती' या शब्दांचा उगम कुठून झाला याचा सुध्दा संशोधन करण्याची गरज आहे. 'विमुक्त' शब्द आला कुठून ? त्याची लक्षणे कोणती ? या सर्वांचे संशोधन होण्याची गरज आहे.

भटका समाज इंग्रजांना पुरुन उरला, १८५७ च्या स्वातंत्र युध्दात लढवय्ये म्हणून पुढे आला. त्या काळी युध्दात संदेश घेऊन जाण्याची तसेच माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सांकेतिक भाषेचा वापर केला जात असे. बऱ्याच वेळा भाकरी सोबत संदेश दिला जात असे. तो पुरुषांपुरता मर्यादित होता. त्यात महिलांचा सहभाग नव्हता. तेव्हा वैदूसमाजाची मदत घेतली गेली. महिलांना बांगड्या भरतांना संदेशाची देवाण घेवाण करुन स्वतंत्र युध्दात महिलांचा सहभाग वाढविला गेला.भटक्या समाजाला इंग्रजांनी गुन्हेगार ठरविण्यामागे हेही एक कारण होते. भटक्या समाजाच्या विविध पैलूंवर योग्य पध्दतीने शोध घेऊन संशोधन करण्याची गरज आहे.

ज्यांना ज्यांना भटक्या समाजाविषयी करुणा आहे, आस्था आहे त्या सर्वांना एकत्र आणून भटक्या समाजाचे प्रश्न, त्यांच्या रोजच्या जगण्यातील अडचणी समोर आणल्या पाहिजेत. त्यासाठी आपले राजकीय व वैचारीक मतभेद बाजूला ठेवून एका व्यासपीठावर आले पाहिजे. भटक्या समाजाचे जीवनमान उंचावणाऱ्या अनेक चांगल्या शिफारशी रेणके आयोगाने संशोधन करुन पुढे आणल्या आहेत. त्यांच्या अंमलबजावणीतील अडचणींचा शोध घ्यावा लागेल.

आपल्या समाजाचा विकास होऊ नये म्हणून अनेकांनी देव पाण्यात ठेवले आहेत. भटक्या समाजाची मते एक गठ्ठा नाहीत म्हणून त्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत का ? त्यामुळे सर्वांनी मिळून हे प्रश्न सोडविले पाहिजेत असे बोलून आपले उद्घाटनपर मार्गदर्शन संपविले.

■■■

३ संशोधन अभ्यासाविषयी

भटक्या भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या समूदायातील मुलांच्या शिक्षणाच्या अधिकार संशोधन अहवालातील प्रमुख मुद्दे व निरिक्षणे डॉ. चंद्रकात पुरी यांनी मांडली. कोणतेही संशोधन लोकांना समर्पित करत नाही, तो पर्यंत त्याचे सार्थक होत नाही. मी हे संशोधन भटक्या समाजासाठी अहोरात्र काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना समर्पीत करतो, असे डॉ. चंद्रकांत पुरी म्हणाले. भटक्या विमुक्त समाजाविषयी वेगवेगळे अभ्यास करणारे, धोरण आणि कार्यक्रम ठरविणाऱ्या आयोगाच्या अध्यक्ष या कार्यक्रमाला आले, त्यांच्या हस्ते संशोधनाचे विमोचन झाले हे निश्चितच सर्वांना प्रेरणा देणारे आहे. मा.आमदार हरीभाऊ राठोड, मा.बाळकृष्ण(अण्णा) रेणके, प्रो. गौतम गवळीसर, मा. प्रो. आर. शिवप्रसाद, केंद्रीय विद्यापीठ, हैद्राबाद, प्रमुख मार्गदर्शक म्हणून या कार्यशाळेत सहभागी झाले. मा. व्यंकटेश कृष्णा, न्यू एज्युकेशन ग्रुप, मा. डॉ. अँथनी डायस, झेविअर समाज संशोधन संस्था, यांनी संशोधन सहाय्य म्हणून या अभ्यासात मोलाची साथ दिली. तसेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागात भटक्या विमुक्त जमातीसोबत काम करणाऱ्या संस्थांचे कार्यकर्ते, विचारवंत व संशोधक मोठ्या संख्येने सहभागी झाले, त्या सर्वांचे डॉ. चंद्रकांत पुरी यांनी आभार मानले.

विमुक्तांचे प्रश्न वेगळे आहेत आणि भटक्यांचे प्रश्न वेगळे आहेत, हे लक्षात घेऊन भटक्या भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या समूदायांचा मुलांचा अभ्यास केला गेला. लातूर व सोलापूर या २ जिल्ह्यातील ४ तालुक्यांची (अक्कलकोट, सांगोला, लातूर व निलंगा) या अभ्यासासाठी निवड केली. शिक्षणाचा अधिकार आणि भटक्या समाजातील शाळेत जाणारी मुले हा या अभ्यासाचा मुख्य लक्ष गट होता. यासाठी ४१७ लोकांचा अभ्यास करण्यात आला. शंभरपेक्षा अधिक फोकस ग्रुप डिक्सशन पूर्ण करण्यात आली, अनेक लोकप्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याशी संवाद साधला. रस्त्यावर जाता येता भेटणाऱ्या १००० पेक्षा अशा लोकांची मते जाणून घेतली. भटके विमुक्त नेमके कुठे आहेत, त्यांचा शोध घेत जवळपास १०० पेक्षा अधिक गावे पालथी घातली. भटका समाज नेमका कुठे रहातो याचा शोध घेतांना एक गोष्ट जाणवली ती अशी की, महाराष्ट्र शासन व केंद्र सरकार यांच्याकडे भटक्या समाजाची माहिती नाही. कारण १९३५ नंतर भटक्यांची जनगणना झालीच नाही. त्यामुळे तातडीने त्यांची जनगणना करण्याची गरज असल्याचे मत डॉ. चंद्रकांत पुरी यांनी व्यक्त केले.

हा अभ्यास संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही पध्दतीने केला आहे.

■■■

४ अभ्यासाचा उद्देश

अभ्यासाचा उद्देश:

१. महाराष्ट्रातील भटक्या, भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या समूदायाची लोकसंख्या जास्त असलेले तालुके शोधणे;

२. सक्तीच्या व मोफत शिक्षणाच्या अधिकाराच्या अंमलबजावणीत भटक्या समुदायातील मुलांचा शाळा प्रवेश व त्यांच्या शाळेतील उपस्थितीबाबत विश्लेषण करणे;

३. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व जीवनाधाराशी संबधीत प्रश्नांचा ऊहापोह करणे;

४. या समुदायांच्या अधिकाराला बळकटी देण्यासाठी आवश्यक कृती कार्यक्रम व कृती आराखडा तयार करण्यासाठी न्यू एज्युकेशन ग्रुप या संस्थेला शिफारस करणे;

हा अभ्यास फक्त ॲकॅडॅमिक न करता त्यातून काही पुरक कृती कार्यक्रमाचा आराखडा समोर ठेवण्याचा प्रयत्न होता.

■■■

५ अभ्यासासाठी निवडल्या गेलेल्या भटक्या जमाती

या अभ्यासादरम्यान भटक्या समाजातील भिक्षेकरी वर्गातील जमातींचा अभ्यास करण्यात आला त्यात प्रमुख्याने पुढील जमातींचा अंर्तभाव होता.

बहुरूपी, जोशी, कोल्हाटी/डोंबारी, फकीर, गोंधळी, मसण जोगी, गोसावी, हेळवे, भराडी/बाळा संतोषी/नाथपंथी डवरी/नाथ गोसावी, पांगुळ, नंदीवाला/तीरुमली, वासुदेव, गारपागरी/नाथजोगी, घिसाडी या अतिवंचित जातींचा अभ्यास करण्यात आला.

६ भटक्या समुदायांच्या अभ्यासातील प्रमुख निष्कर्ष

भटक्या समुदायांच्या अभ्यासातील प्रमुख निष्कर्ष:

सामाजिक, आर्थिक वास्तव आणि जगण्याचा संघर्ष:

- अभ्यासादरम्यान भेटलेल्या एकूण कुटुंबांपैकी ५६.६ टक्के कुटुंबे विभक्त होती. एकत्रित कुटुंबातून विभक्त कुटुंबात जाण्याचे प्रमाण भटक्या समाजात वाढते आहे.
- ३२ टक्के लोकांकडे स्वत:चे घर नाही, तर ५६टक्के लोकं कच्च्या घरात राहातात.
- केवळ २० टक्के कुटुंबांकडे शेतीयोग्य जमीन आहे.
- या समाजात पोलीसांविषयी भीती वाटण्याचे प्रमाण सुमारे १३.४ टक्के आहे. हे प्रमाण धक्का देणारे होते. त्याचे मूळ कारण समजून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा असे समजले की पोलिसांसोबत कसा व्यवहार करावा याची माहिती या समाजातील लोकांना आता समजली आहे.
- उत्तर देणाऱ्या बहुतेक लोकं (४२ टक्के) आपले प्रश्न जात पंचायतीत सोडवितात तर, २०टक्के लोकं आपले मुद्दे गाव पंचायतीत सोडवितात. केवळ (७.७ टक्के) लोकं पोलीसांकडे जातात. समाजांतर्गत झालेल्या वादविवादांसाठी पोलीसांकडे जाण्याचे प्रमाण या समाजात अतिशय नगण्य म्हणजे ७.७ टक्के इतके आहे. याचे कारण जेव्हा लोकांना विचारण्यात आले तेव्हा लोकांनी सांगितले की पोलीस या समाजाला चोर ठरवितात, त्यामुळे त्यांच्याकडे न्याय मिळेल असे लोकांना वाटत नाही.
- ३.४ टक्के लोकांनी आपल्याविरोधात होणाऱ्या अत्याचाराची नोंद पोलीसांकडे केली आहे. अत्याचार प्रतिबंध कायद्यात भटक्या समाजाचा अंतर्भाव नाही. याची खरी गरज भटक्या समाजाला आहे, कारण त्यांच्यावर जातीआधारित होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण खूप आहे.

नागरिकत्वाची कागदपत्रे: दंतकथा कथा आणि वास्तव

- ९० टक्के लोकांकडे आधार कार्ड आहे, तर ८८.५ टक्के - लोकांकडे मतदान पत्र आहे. भारताचा नागरिक म्हणून हे दस्तावेज आहेत, तसेच ते जागृत मतदार सुध्दा आहेत.
- ६५ टक्के लोकांकडे अंत्योदय कार्ड आहे. खरे तर भटक्या समाजातील प्रत्येक कुटुंब हे अंत्योदय योजनेचे लाभार्थी असायला हवे.
- २६ टक्के लोकांकडे रेशन कार्ड नाहीत, तर ६५.३ टक्के लोकांकडे अधिवास दाखला आहे.
- ४० टक्के लोकांकडे जातीची प्रमाणपत्रे आहेत. जात प्रमाणपत्रांचे वितरण तातडीने होण्याची गरज आहे.
- ४५.५ टक्के लोकांकडे बँक खाती नाहीत. (हा अभ्यास जनधन योजना लागू होण्यापूर्वीचा आहे.)

उपजिविका आणि स्थलांतर:

- ३५.७ टक्के लोकांना कामाच्या शोधात फिरत राहावे लागते. ७३ टक्के लोकांनी

सांगितले की त्यांच्या पारंपारिक रोजगारातून त्यांना दोन वेळचे पुरेसे जेवण मिळू शकत नाही.

- ७७ टक्के लोकांनी त्यांना पारंपारिक काम सोडून दुसरे काम शोधण्यची गरज व्यक्त केली. केवळ १०टक्के लोकांना कोणत्या तरी सरकारी योजनेचा फायदा झाला आहे.

भटक्या समूहातील मुलांच्या शिक्षणाच्या अधिकाराच्या अंमलबजावणीतील निरीक्षणे:

- ६ ते १४ वर्षे वय असलेल्या ७० टक्के मुलांची नावे शाळेत दाखल केलेली होती. २८.३ टक्के मुलांना स्थलांतरीत झाल्यामुळे शाळा प्रवेशाची समस्या भेडसावते.
- ७६.६ टक्के मुलांना शिक्षण हक्क कायद्याची माहिती नाही. ५१.७ टक्के लोकं शाळेतील पालक व शिक्षक सभांना उपस्थित राहातात.
- बहुतांश शाळांमधील स्वच्छतागृहे अस्वच्छ असल्यामुळे वापरली जात नाहीत.
- काही मुलांनी त्यांच्याशी शाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांकडून भेदभावाची वागणूक दिली जाते, असे सांगितले.

अभ्यासातून पुढे आलेल्या निरीक्षणांच्या आधारे करण्यात आलेल्या प्रमुख शिफारशी:

१. भटक्या समाजाची जात निहाय जनगणना झाली पाहिजे, जेणेकरून त्यांच्या लोकसंख्येच्या आधारे विकासाचा आराखडा आखणे सोपे होऊ शकेल.

२. अनुसूचित जाती व जमाती प्रमाणे भटक्या विमुक्त जाती व जमातींना घटनात्मक दर्जा मिळाला पाहिजे.

३. मानववंशशास्त्रानुसार भटक्या समाजाच्या खऱ्या इतिहासाची नोंद घेण्याची गरज आहे. या नोंदीचा दस्तावेज त्या समाजातील शिक्षित लोकांना सोबत घेऊन तयार करावा.

४. भटक्या समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी अनेक आयोग नेमण्यात आले. आता कमिशन नेमण्यापेक्षा सर्वच आयोगांनी केलेल्या शिफारशींच्या आधारे नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करावा.

५. भटक्या समाजात जातीच्या दाखल्याची समस्या गंभीर आहे. भटक्या समाजाच्या वस्तीत विशेष शिबिरे घेऊन जातीच्या दाखल्याचे वितरण करण्यात यावे.

६. भटक्या समाजाला आजही गावातील प्रस्थापितांकडून व पोलिसांकडून अमानुष वागणुक दिली जाते. सन्मानाने जगण्याच्या अधिकारापासून वंचित ठेवणाऱ्या या मारहाणीच्या घटनांना आळा घालण्यासाठी तातडीने गंभीर पावले उचलावीत.

७. भटक्या समाजातील अतिदुर्लक्षित गट जसे, वृद्ध, विशेष गरजा असलेली मुले व व्यक्ती, अपंग मुले व व्यक्ती यांच्यासाठी विशेष सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहीजेत.

८. ग्रामसभेत भटक्या समाजाच्या प्रश्नावर चर्चाच होत नाही, म्हणून भटक्या समाजातील लोक ग्रामसभेत जात नाही. त्यांना ग्रामसभेचे महत्त्व समजून दिले पाहीजे व भटक्यांच्या प्रश्नाला ग्रामसभेने प्राधान्य देण्याविषयीचे आदेश काढण्यात यावेत.

९. भटक्या समाजाच्या शाश्वत उपजिविकेसाठी उपजिविकेच्या पुर्ननिर्मितीचे प्रकल्प

हाती घ्यावेत.

१०. भटक्या समाजाचे प्रश्न समजून घेऊन त्यांच्याविषयी संवेदनशीलता वाढीस लागण्यासाठी पोलीस तसेच अन्य जबाबदार यंत्रणेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जावेत.

११. भटक्या समाजातील अनेक पारंपारिक व्यवसाय विविध कायद्यांच्या बडग्यामुळे धोक्यात आली. अशा व्यवसायावर उपजिविका अवलंबून असणाऱ्या कुटुंबाच्या पुर्नवसनासाठी विशेष कार्यक्रम हाती घ्यावेत.

१२. भटक्या समाजातील अनेक लोकांनी पर्यायी उपजिविकेची मागणी केली आहे. त्यामुळे सरकारने विविध यंत्रणांची मदत घेऊन उपजिविकेसाठी विशेष कालबद्ध नियोजन करावे. राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभियानाने या समूहांच्या गरजा लक्षात घेऊन विशेष कार्यक्रमाचे नियोजन करावे.

१३. राष्ट्रीय आजिविका अभियानाने भटक्या विमुक्त समाजासाठी विशेष गट म्हणून लक्ष द्यावे.

१४. सामाजिक संस्थांनी भटक्या समाजाच्या प्रश्नांकडे अधिक लक्ष केंद्रीत करून काम करण्याची गरज आहे.

१५. शाळेमधील शिक्षकांच्या रिक्त जागा भरल्या जाव्यात. तसेच त्यांच्या शिकविण्याच्या तासांची निश्चिती झाली पाहिजे जेणेकरून मुलांना दर्जेदार शिक्षणाची हमी मिळू शकेल.

१६. शाळेत खेळाचे मैदान व साहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध झाली पाहिजेत.

१७. शाळेमध्ये संगणकीय शिक्षण सहज उपलब्ध झाले पाहिजे.

१८. पारंपारिक व्यवसायामुळे स्थलांतरित झालेल्या भटक्या समजाच्या मुलांसाठी पाल शाळा सुरु कराव्यात.

१९. शाळेमध्ये दिले जाणारे मध्यान्ह भोजन हे सकस व दर्जदार असावे.

२०. मुंबई विद्यापीठाने या अभ्यासातून येणाऱ्या निरीक्षणांतून कालबद्ध कृती आराखडा तयार करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

२१. या अभ्यास प्रकल्पात सहभागी झालेल्या न्यू एज्युकेशन ग्रुप व झेविअर्स समाज संशोधन या संस्थांनी अभ्यासातून पुढे आलेल्या शिफारशीतून कृती कार्यक्रमाची आखणी करण्यास पुढाकार घ्यावा. तसेच या समाजाची स्थिती सुधारण्यासाठी प्रत्यक्ष कृती करावी.

भटक्या विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांच्या विकासाचा मार्गदर्शक आराखडा तयार करण्यासाठी हा अभ्यास नक्कीच मार्गदर्शक होऊ शकतो. या अभ्यासात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु व रजिस्टर यांचा मोलाचे सहकार्य तसेच न्यू एज्युकेशन ग्रुप व झेविअर समाज संशोधन संस्था याची भागीदारी, त्याच सोबत अभ्यासात सहभागी झालेली जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्ते यांचे सहकार्यामुळे हा अभ्यास वेळेत पूर्ण होण्यात मदत झाली अशी भावना डॉ. चंद्रकांत पुरी यांनी व्यक्ती केली.
यानंतर, कार्यशाळेत सहभागी झालेल्या अन्य कार्यकर्ते व तज्ञ व्यक्तींनी या विषयावर आपली मते व्यक्त करण्यासाठी चर्चा खुली करण्यात आली.

■■■

७ संशोधन अभ्यासाविषयी सन्माननीय सदस्यांची मते

पारंपारीक व्यवसायाच्या बदलाचे सखोल चिंतन गरजेचे: प्रो. शिव प्रसाद

अभ्यासातून पुढे आलेल्या मुद्यांवर खुल्या चर्चेत मांडणी करतांना प्रो. शिव प्रसाद, केंद्रीय विद्यापीठ, हैद्राबाद म्हणाले की, भटक्या भिक्षेकरी समाजाच्या पारंपारिक कामात बदल होत आहे त्याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. हा समाज कोणत्या नवीन कामात स्वत:ला जोडून घेत आहे, त्यातून त्याच्या शाश्वत उपजिविकेचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे का? रोजगार हमी सारख्या योजना शाश्वत उपजिविकेचा आधार होऊ शकत नाही. कामाने व्यक्तीची ओळख बदलते. त्यामुळे त्याचा संपूर्ण अंगाने विचार झाला पाहिजे. या कामामुळे व्यक्ती व समूहांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनावर होणारे परिणाम अधिक समजून घेण्याची गरज आहे. पारंपारिक व्यवसायाची साधने बदलणे हे नुसते उपजिविकेशी निगडीत नाही, त्यामुळे त्याचे सखोल चिंतन होणे गरजेचे आहे.

जातपंचायत हा त्यांच्या न्यायनिवाड्याच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. जातपंचायतीमधील न्याय निवाडा त्यांना नैसर्गिक न्याय देणारी प्रक्रिया वाटते. अन्याय करणारी आणि अन्याय झालेल्या दोन्ही घटकांचे यातून समाधन होते आहे. त्यामुळे ती व्यवस्था आजही टिकून आहे. त्यामुळे त्याकडे सकारात्मक रितीने पहावे लागेल.

कोणतेही शिक्षण मातृभाषेत भाषेत असेल तर लवकर आत्मसात होते. भटक्यांच्या अनेक बोलीभाषा आहेत, त्यांना त्यांच्या पारंपारिक बोलीभाषेते प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे. मातृभाषेतील शिक्षण हे त्यांच्या विकासाला सहाय्यभूत होत असते. भटक्या समाजाच्या मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी त्याच्या भाषेत शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार झाला पाहिजे.

सर्व समावेशक विकासाचे धोरण ठरवून योजना व कार्यक्रमांची आखणी करण्याची प्रक्रिया सुरु झाली असली तरी विकासाचे लाभार्थी म्हणून भटक्या समाजाची संख्या वाढल्याचे दिसून येत नाही.

भटक्या समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज आहे - मा. व्यंकटेश कृष्णन

भटक्यां समाजाच्या स्व:ओळखीचे व आत्मसन्मानाचे मुद्दे, मुलांच्या शिक्षणातून त्यांच्या पिढीत होत जाणाऱ्या विविध बदलांवर तसेच त्यांच्या प्राधान्याचे मुद्दे, जगण्याचे प्रश्न आणि उपजिविकेची साधने यावर

अधिक प्रकाश टाकण्याची गरज आहे. या समाजाला कशा रितीने शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणता येईल याचाही विचार झाला पाहिजे. जगण्याची साधने कशी निर्मितीक्षम होऊ शकतात, ज्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावेल, याची सखोल चर्चा झाली पाहिजे अशी सूचना मा. व्यंकटेश कृष्णन, कार्यकारी संचालक, न्यू एज्युकेशन ग्रुप यांनी केली.

या संशोधनाचा फायदा अभ्यासकार व धोरण बनविणाऱ्यांना होईल.
-डॉ. अँथनी डायस

या अभ्यासविषयी मत व्यक्त करतांना डॉ. अँथनी डायस, झेविअर्स समाज संशोधन संस्था, म्हणाले की या अभ्यासाच्या घडामोडींचे ते एक प्रमुख साक्षीदार आहेत. मधल्या काळात हा संशोधन अभ्यास कुठे तरी अडकला होता.

डॉ. चंद्रकात पुरी, मा. व्यंकटेशन कृष्णन यांच्या पुढाकाराने व झेविअर्स समाज संशोधन संस्थेच्या मदतीने त्याला गती मिळाली. या अभ्यासातून अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर भाष्य करण्यात आले आहे. त्याचा फायदा अभ्यासकार व निती बनविणाऱ्यांना नक्कीच होईल अशी आशा आहे.

भटक्या समाजाच्या विकासासाठी डेव्हलपमेंट कापोरेशन (विकास बोर्ड) तयार करा - मा. आमदार हरीभाऊ राठोड

महाराष्ट्रातील भटक्या भिक्षेकरी व करमणुक करणाऱ्या समुदायांतील मुलांच्या शिक्षणाविषयीच्या संशोधनाकडे लक्ष वेधतांना मा. आमदार हरीभाऊ राठोड म्हणले, सगळ्यात वाईट स्थिती भटक्या समाजाची आहे. त्याची परंपरागत जगण्याची साधने कोणत्या ना कोणत्या कारणांनी नष्ट होत आहेत. त्याची जनगणना झालेली नाही, त्यामुळे त्यांची नेमकी आकडेवारी आज उपलब्ध नाही. देशभरात भटक्या विमुक्त अनेक जाती जमाती आहेत. त्यांची सुध्दा नेमकी आकडेवारी नाही. त्यामुळे भटक्या

भिक्षेकरी समाजाचे जीवनपट उलगडून दाखविणाऱ्या चित्र प्रदर्शनीचे उद्घाटन मा.आमदार हरीभाऊ राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

समाजाच्या जनगणनेचा कार्यक्रम सर्व प्रथम हाती घेतला पाहिजे. शाळा गळतीचे प्रमाण भटक्या समाजात अधिक आहे, त्यात भटकंती करुन उपजिविका करणाऱ्या समाजात तर हे प्रमाण अधिक आहे. त्यांच्यासाठी आपल्याला विशेष शाळा सुरु करता येतील का ? याचा विचार झाला पाहिजे. भिक्षा मागणे हा गुन्हा असल्यामुळे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्यां अनेक भटक्या समाजाच्या कुटुंबांच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. भटक्या समाजाच्या विकासासाठी डेव्हलपमेंट कापोरेशन (विकास बोर्ड) तयार करण्याची गरज आहे. त्यातून त्यांना नव्या धंदा किंवा व्यवसायाला आर्थिक मदत देणारी यंत्रणा उभी करावी लागेल. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ११ टक्के भटक्या विमुक्त जमातींची संख्या लक्षात घेऊन निधीची तरतुद केली जात नाही आणि योजना नाहीत. भटक्या विमुक्त जाती जमातींना आजही घटनात्मक दर्जा न मिळाल्यामुळे आरक्षणाचा लाभ घेता येत नाही. या समाजाची मुले डॉक्टर, इंजिनिअर झाली पाहिजेत त्यासाठी चांगल्या सुख सोयी असणाऱ्या शाळा व महाविद्यालय सुरु करण्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सोलापूर पॅटन प्रमाणे जातीचे दाखले घर बसल्या मिळण्यातील अडचणी दूर झाल्या पाहिजेत. दारिद्र रेषेखाली भटक्या जातीतील कुटुंबांचा ॲटोमेटिक सहभाग झाला पाहिजे. प्राथमिक शिक्षण बोलीभाषेत मिळण्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्याची गरज आहे. शिक्षण आणि जगण्याची साधने यांचा संबध आहे. पारंपारीक व्यवसायाला लोकमान्यता मिळाली पाहिजे इत्यादी मुद्दे मांडले.

भटक्या समाजाच्या सुरक्षितेचा अधिकार महत्त्वाचा आहे - मा. बाळकृष्ण रेणके

मा. बाळकृष्ण रेणके, माजी अधयक्ष, राष्ट्रीय भटक्या विमुक्त जमाती आयोग, यांनी या अभ्यासातील अनेक मुद्यांचा परामर्श घेत काही ठोस मुद्दे मांडले. ते म्हणाले की, भटक्या समाजाच्या मुलांविषयीचे शिक्षणाचे धोरण ठरविण्यासाठी हा अभ्यास शासनाला मार्गदर्शक ठरेल. तसेच विविध संस्था संघटनांना यातील प्रश्ना भोवती आपल्या कामाची व्याप्ती वाढविण्यास मदत मिळेल. या अभ्यासातून पुढे आलेल्या काही गोष्टी सकारात्मक आहेत, जसे आधार कार्ड, रेशन कार्ड, दारिद्र रेषेखालील यादीत नावे इत्यादी दस्तावेज भटक्या कुटुंबांकडे आहेत. मात्र त्याचा किती लाभ या कुटुंबांना मिळतो, हा प्रश्न आहे. नागरिकत्त्वाचा अधिकार मिळण्यात येणाऱ्या अडचणींचे अनेक दाखले देता येतील. ठाणे जिल्ह्यात नागपंथी समाजाला यशवंत आवास योजने अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांनी जागा उपलब्ध करुन दिली. मात्र स्थानिक लोकांनी जमिनीचा कब्जा घेतांना अनेक अडथळे उभे केले. मयत झाल्यानंतर स्मशानभूमीत जागा मिळण्यासाठीसुध्दा संघर्ष करण्याची वेळ भटक्या समाजाला येते. त्यामुळे भटक्या समाजाचा

सुरक्षिततेचा अधिकारही महत्त्वाचा आहे. भटक्या समाजातील मुलांची शाळा गळती हा गंभीर मुद्दा आहेच. त्यांना जीवन शिक्षण कसे मिळेल याचा विचार करण्याची गरज आहे. कडक लक्ष्मी, नागपंथी, मसणजोगी अशा कितीतरी जातींना कायद्याच्या जाचक अटींमुळे पारंपारिक उपजिविकेची साधने सोडावी लागत आहेत. जातीचे दाखले मिळविणे आजही खूप मोठी समस्या भटक्या समाजात आहे. ज्यांना दाखले मिळाले, त्याच्या जात प्रमाणपत्राच्या पडताळणीचा प्रश्न अधांतरीच आहे. त्यासाठी समाजातील सर्व तज्ज्ञ कार्यकर्ते आणि अभ्यासतज्ञ यांचे राज्यस्तरीय कार्यक्रम घेऊन मार्ग काढावा लागेल.

काळानुरुप व्यवसाय परिवर्तनाचा मुद्दा महत्त्वाचा आहे. माझी जात माझ्या आजुबाजूचे लोक ठरवितात. लोकांच्या गरजा भागविणारे व्यवसाय निवडून कौशल्ये व क्षमता विकसित करावी लागतील. पर्यावरण समुध्दी आणि दारिद्र निर्मुलन हे दोन मुद्दे जगासमोर आहेत. त्यावर आधारीत व्यवसाय कौशल्ये विकसीत करावी लागतील. करपल्लवी सारख्या पारंपारीक कला कौशल्यांचे जतन करुन त्यांचे संवर्धन झाले पाहिजे. शिक्षण हे नुसते डिग्री घेण्यासाठी नसून जीवन शिक्षण देणारे असले पाहिजे.

भटक्या विमुक्त जातीजमातीची जनगणना करण्याची मागणी युपीएच्या राष्ट्रीय सल्लागार समितीने मान्य करुनही प्रत्यक्षात आली नाही. या अभ्यासातील अनेक मुद्यांविषयी शासनाला ठोस शिफारशी देण्याची गरज आहे.

■■■

८ कार्यकर्ते व तज्ज्ञ मान्यवरांचे अभ्यासाविषयीचे विचार आणि विकासासाठी सूचना

या सत्राचे अध्यक्ष प्रो. गौतम गवळी, संचालक, भारतीय सामाजिक शास्त्र, संशोधन परिषद, पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई विद्यापीठ होते. सत्रात सामाजिक कार्यकर्ते व विचरवंत यांनी संशोधन अहवाल विषयी पुढील मुद्दे व सूचना मांडल्या.

- भटक्या समाजाकडे अतिशय अल्प अशी जमीन आहे, हे अभ्यासातून पुढे आले आहे. त्या जमिनींचे स्वरुप कसे आहे, हे समजून घ्यावे लागेल. भटक्या समाजातील अनेकांना इमानी जमिनी मिळाल्या होत्या. त्यावर गाव गुंडांनी कब्जा केला आहे. तर इमानी जमिनीवर कोणतेही शेती कर्ज मिळत नाही. त्यामुळे त्या विकासीत करण्यात अडचणी येतात.
- भटक्या समाजातील मुलांना त्यांच्या बोलीभाषेत प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे. त्याचा अभ्यासक्रम तयार झाला पाहिजे.
- भटक्या समाजातील मुले आश्रमशाळा, जिल्हा परिषदेच्या व खाजगी शाळेत जाण्याचे प्रमाण किती आहे हे शोधून त्यासंबंधीचा कार्यक्रम ठरविता येईल.
- आदिवासी समाजासाठी जसा विकास आराखडा केला जातो, निधीची तरतुद केली जाते तसा विकास आराखडा व निधीची तरतुद भटक्या विमुक्त समाजासाठी केली जावी. त्यातून काही प्रमाणात उपजिविकेचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.
- काही जाती व जमातींमध्ये पारंपारीक व्यवसाय करण्यास नकार दिल्यामुळे त्या कुटुंबांना जातीतून बाहिष्कृत केले जाते. हे अधिक गंभीर असून त्याविषयी त्या जमातींशी संवाद करण्याची गरज आहे.
- भटक्या समाजाला स्थिर करण्यासाठी त्यांना शासनाच्या यशवंत आवास योजनेत सहभागी करुन त्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी निवारा उपलब्ध करुन दिला पाहिजे.
- शाळेत जाणाऱ्या मुलांची जातीची नोंद करतांना पालकांनी काळजी घेतली पाहिजे, कारण हीच नोंद जातीचा दाखला काढण्यासाठी उपयुक्त पुरावा होऊ शकतो.
- भटक्यांचा इतिहास हा दऱ्या डोगरातला आहे. आजपर्यंत ते समूह गावकुसाबाहेर, जंगलात होते. त्यांना गावांची गरज नव्हती. मात्र शासनाने त्यांची जंगले बळकावली,

जमिनी घेतल्या त्यामुळे गावाशी जुळवून घेण्याची गरज लागली. जसे रामाने माकडाला मारुती हे नाव देऊन सोबत घेतले. तसे त्यांना या सरकारने काही तरी नाव देऊन भटक्या समाजाच्या विकासाची दिशा निश्चित केली पाहिजे. भटक्या समाजाला जातीचे दाखले सहज मिळतील यासाठी यंत्रणा उभी करण्याची गरज आहे.

- या अभ्यासात जो जिवंतपणा आला आहे. त्याचे कारण हा अभ्यास करण्यात प्रत्यक्षात पालावरची माणसे सहभागी झाली होती, त्यामुळे या अभ्यासाचा पालावर राहणाऱ्या माणसांना नक्कीच उपयोग होईल.
- भटक्या विमुक्त समाजाच्या अडचणी सोडविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, त्यात आयोग, संशोधक, ॲकॅडॅमीक आणि लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे.
- ३० टक्के मुले शाळेत जात नाही असे अभ्यासातून पुढे आले आहे. त्यांच्या शिक्षणासाठी मोबाईल व्हॅन सारखे प्रयोग करुन शिक्षण देण्याची व्यवस्था होऊ शकते. हे संस्थांच्या कामाच्या अनुभवातून सिध्द झाले आहे. त्याचा विचार करण्यात यावा.
- महाराष्ट्रात शिक्षण दिवसेंदिवस महाग होत आहे. शिक्षणाची शिष्युवृत्ती मिळण्यासाठी परीक्षेत पास होण्याची अट आहे. त्यामुळे अनेक भटक्या समाजातील मुलांना शिष्यवृत्ती मिळत नाही.
- शासनाच्या मदतीने पालावरची शाळा सुरु करणे शक्य आहे. त्यांच्या बोलीभाषेत, त्यांच्या समाजातील शिक्षित युवकांच्या मदतीने नागपूर मध्ये हा प्रयोग करण्यात आला. त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला होता. आज तिथे २ शाळा सुरु आहेत.
- भटक्या समाजाचा जातीच्या दाखल्याचा प्रश्न सोडविला गेला तर त्यांच्या विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागतील.
- आश्रमशाळेतील मुलींच्या गळतीचा शोध घेणे गरजेचे आहे. भटक्या समाजात भिक्षेकरी मुली ह्या अधिक वंचित आहेत. भिक्षेकरी समाजातील डोंबारी, बहुरुपी अशा अनेक कुटुंबांची उपजिविका त्यांच्या मुलांवरच अवलंबून असते. त्यामुळे अशा मुलांना शिष्युवृत्ती देऊन त्यातून त्यांच्या कुटुंबाच्या उपजिविकेचा प्रश्न सुटेल अशी व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे.
- ८ वी पर्यंत कोणत्याही विद्यार्थ्यांना नापास करायचे नाही हे धोरण आपल्या समाजातील मुलांसाठी घातक आहे.
- शिक्षण घेणाऱ्या भटक्या विमुक्त समाजातील मुलांसाठी वसतीगृहांची संख्या वाढली पाहिजे, त्याच बरोबर अशा मुलांच्या शिक्षणासाठी राखीव निधीची तरतुद करण्याची गरज आहे.

या अभ्यासातील संशोधनाच्या आधारे पुढचे धोरण व कार्यक्रम भटक्या समाजातील मुलांच्या शिक्षणाचे धोरण ठरविणे शक्य आहे. सभागृहात विविध प्रतिनिधींनी मांडलेल्या अनुभवातून हेच समोर येत आहे की शिक्षण हाच उन्नतीचा मार्ग आहे. आजचे व्यवसाय शिक्षण हे २० वर्षांपूर्वीचे आहे. त्याला भविष्याची जोड देण्याची गरज आहे. आज जवळपास १४० वेगवेगळी व्यावसायिक शिक्षण देणारे व्यवसाय आहेत. लोहाराच्या

मुलाने लोहाराचे काम करावे किंवा चर्मकारांच्या मुलांनी चामडीचे काम करावे अशामुळे पुन्हा एकदा जाती व्यवस्था भक्कम होऊ शकते. ते समाजासाठी घातक आहे. गरीब वंचित समाजातील अनेक पालक कष्ट करुन आपल्या मुलांना शिक्षण देतात. त्यामुळे भविष्याचा विचार करुन व्यवसाय शिक्षण विकसीत झाले पाहिजे. आज सर्वच क्षेत्रात स्पर्धा आहे. त्या स्पर्धेत आपल्या समाजातील मुले कशी टिकतील हा प्रश्न आहेच. पण त्यांचा आत्मविश्वास कमी होणार नाही. याची काळजी पालकांनी घेतली पाहिजे. पालकांचे मुलांच्या सोबत असणे हे मुलांना नेहमीच प्रेरणा देणारे असते. आज आपल्यासमोर अनेक प्रश्न आहेत. शासन स्तरावर धोरण, कार्यक्रम ठरविणारे अनेक सहकारी आज आपल्यासोबत आहेत. समाजातील भेदभावांमुळे भटक्या विमुक्त जाती समूहांतील लोकांचा विकास होऊ शकला नाही. भटक्या समाजाची भटकंती थांबविण्यासाठी त्यांना व्यवसाय कौशल्ये देणारे शिक्षण उपलब्ध करून देण्याची गरज आहे. हा संशोधन अहवाल जेव्हा प्रकाशित होईल तेव्हा तो अनेकांना प्रेरणा देणार असेल अशी आशा प्रो. गौतम गवळी यांनी व्यक्त केली.

■■■

९ समारोप सत्र

कार्यशाळेच्या शेवटच्या समारोपीय सत्राची प्रस्तावना करतांना मा.आमदार हरीभाऊ राठोड यांनी खालील मुद्दे मांडले.

आतापर्यंत या क्षेत्रात काम करणारे अनेक जण मा. रेणके आयोगाच्या शिफारशी लागू करा अशी एकमुखी मागणी करीत होतो. आता दादा इदाते यांच्या नावाने घोषणा देण्याची वेळ आली आहे. दादांचा भटक्या विमुक्त समाजाविषयी अभ्यास आहे. त्यांना प्रश्नांची चांगली जाण आहे. आयोगाचे अध्यक्ष या नात्याने त्याचा फायदा आपल्या समाजाला नक्कीच होईल. दादा इदातेंच्या अध्यक्षतेखाली १९९९ साली इदाते समिती स्थापन केली होती. आता त्यांना देशातील भटक्या विमुक्त समाजाचा अभ्यास करुन त्यांचे प्रश्न पुढे आणायचे आहेत.

भटक्या विमुक्त समाजाचा जनगणनेचा प्रश्न, भटक्या विमुक्तांचे सूची -३ चे स्वतंत्र परिशिष्ठ असे काही महत्त्वाचे प्रश्न त्यांच्या समोर आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कलम १६/४ मध्ये एखाद्या राज्याला गरजनुसार वंचित समाजाला आरक्षण ठेवण्याचा अधिकार असल्याचे सूचीत केले आहे.

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त समाजाचे जातीच्या दाखल्याचा प्रश्न राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून आमच्या हाती आहे. भविष्यात त्याला प्राधान्य दिले जाईलच. ॲकॅडॅमिक संस्थांनी केलेल्या संशोधनाचा आधार घेऊन आपले प्रश्न शासनापर्यंत पोहचविण्याचे माध्यम आहे. भटक्या विमुक्त समाजाचा पहिला अभ्यास टाटा सामाजिक विज्ञान संस्थेनी केला होता. त्याचा आधार घेऊन भटक्या समाजासाठी अनेक धोरणे व कार्यक्रम हाती घेण्यात आले. डॉ. चंद्रकांत पुरी यांनी केलेल्या संशोधनातील शिफारशींचा अभ्यास करुन कृती आराखडा तयार करता येऊ शकतो.

दादा इदाते आज २२ कोटी भटक्या विमुक्तांचे प्रतिनिधी म्हणून आयोगाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या हातून अनेक प्रश्न मार्गी लागतील असा विश्वास आहे.

कार्यशाळेच्या समारोपाच्या सत्रात मार्गदर्शन करतांना मा. दादा इदाते म्हणाले की, कोणताही अभ्यास करण्यासाठी मन खंबीर असावे लागते. त्यांनी स्वत: अनके अभ्यास संशोधने केली आहेत. सर्व्हेक्षण कसे केले जाते याची त्यांना माहिती आहे. ते ज्या

जातीत जन्माला आले, त्या जातीत अनेक चांगले बदल त्यांनी केले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात त्यांचे गाव आहे. त्यांच्या समाजाची वस्ती कुठे आहे हे पहाण्यासाठी त्यांनी नकाशे आणले. त्यांचे बारकाईने निरिक्षण केल्यानंतर अनेक ठिकाणी भिकारवाडा असे शब्द आढळले. त्याचा अर्थ समजून घेतल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की भटक्यांच्या वस्तीचा उल्लेख भिकारवाडा असा करण्यात आला आहे. आज त्या वस्तीचे चित्र बदलले आहे. आज आजूबाजूच्या गावातील भटक्या समाजातीची शैक्षणिक व आर्थिक प्रगतीही चांगली झाली आहे. समाजाच्या बदलासाठी त्यांनी आयुष्यभर अनेक प्रयोग केले आहेत. या समाजात कोणताही सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम हा दारू शिवाय पूर्ण होत नसे. त्यामुळे समाजातील दारुबंदी हे त्यांच्यासाठी मोठे आव्हान होते. ते स्वत: पेशाने शिक्षक होते. त्यांच्या मुलाच्या जन्मानंतर त्यांनी त्याचे बारसे न करण्याचे ठरविले. समाजातील लोकांना जेव्हा त्याचे कारण समजले तेव्हा त्यांनी बैठक घेऊन आम्ही यापुढे दारूला हात लावणार नाही, असा ठराव करुन त्यांच्यासमोर ठेवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार देशभर पोहोचविण्यासाठी दादा इदाते यांनी जवळपास २०० पेक्षा अधिक ठिकाणी भाषणे दिली आहेत. डॉ. बाबासाहेबांचे विचार व आचार हा आपल्या समाजाच्या उन्नतीचा मार्ग होऊ शकतो हा उद्देश होता.

ते स्वत: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संघटनेचा अखिल भारतीय स्तरावरील नेता आहे. मुलींसाठी शबरी नावाने पत्र्याच्या शेडमध्ये वसतीगृह सुरु केले. आज तेथे १ कोटी खर्च करून मोठे वसतीगृह उभे आहे. या वसतीगृहातील जवळपास २०० पेक्षा अधिक मुली विविध शासकीय सेवेत आहेत. काही जणी जिल्हाधिकारी पदापर्यंत पोहोचल्या आहेत. आपण जिथे राहातो तिथे काय करता येईल, आपल्या आजुबाजूच्या समाजाचे स्थानिक प्रश्न कसे सोडविता येतील याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.

जातपंचायत न्यायदान करणारी व्यवस्था असली तरी त्यातील अंधश्रध्दा नष्ट केली पाहिजे. या समाजातील एक बाई बाळाला जन्म देतांना अडली, मात्र ती काही करुन डॉक्टरकडे दवाखान्यात जाण्यास तयार नव्हती. तिचे बाळंतपण व्हावे म्हणून एक बाई तिच्या पोटावर उभी राहीली. तरी ती दवाखान्यात जाण्यास तयार नव्हती. कारण डॉक्टर हा परपुरुष, त्याचा हात बाईच्या शरीराला लागणे पाप मानले जात असे. समाजातील अशा चालीरिती मोडण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

आयोगाचा अध्यक्ष पद मिळणे ही एक इश्वरी कृपा असल्याचे त्यांनी सांगितले, परमेश्वररुपी समाजाची सेवा करण्याची अध्यक्ष या नात्याने ही संधी मिळाली आहे. त्यांनी आश्वासन दिले की ते संपूर्ण देशभर फिरुन भटक्या समाजाची माहिती घेतील. लोकांमध्ये गेल्याशिवाय त्यांचे प्रश्न समजत नाही. आयोगाचा अध्यक्ष या नात्याने असलेल्या अधिकाराचा उपयोग ते समाजाच्या विकासासाठी नक्कीच करतील.

डॉ. पुरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले संशोधन भटक्या समाजातील शिक्षणाचे वास्तव पुढे आणते. या अभ्यासातून पुढे आलेल्या शिफारशीचा सखोल अभ्यास करुन त्याच्या आधारे कृती आराखडा तयार करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन मा. दादा इदाते यांनी दिले. प्रयत्न केले की त्याला यश मिळते, या विश्वासावर दादांनी आपले भाषण संपविले.

यानंतर बळीराम बाळसराफ यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवर व आयोजक या सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याची घोषणा केली.

■■■

संशोधन अहवाल व प्रकाशन आणि प्रसारण कार्यशाळा

दिनांक :१८ फेब्रुवारी ,२०१५

कार्यशाळेतील सहभागी प्रतिनिधी

अनु	उपस्थितांची नावे	संस्थेचे नाव व पत्ता	भ्रमण ध्वनी क्रमांक व इमेल
१	शालू तरमाले	डीबीएसएस, सरसा, लातूर	९९६०७५३७०९ dilasa_shalu@in.com
२	प्रशांत आगळे	पी.एच.डी. विद्यार्थी	९०२९८५००७५ prashantagale2000@yahoo.co.in
३	संजय चाबूकस्वार	उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव	९२२६५७८८४५ chabukswarsp@gmail.com
४	विजय वळंजू	पनवेल	९८६९५७६७२० vijaysasa31@gmail.com
५	थॉमस जेकॉब	वेस्टन रिजन सोशल सर्विस फोरम	९८९२२८३६००
६	डॉ. शाली जोसेफ	यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क, सातारा	८९७५२१४०७४ shdyjperid.@gmail.com
७	श्रीराम बेलवलकर	विकास सहयोग प्रतिष्ठान	९४०४३३५६५९
८	मनिष सूर्यवंशी	विद्यार्थी	
९	दादाराव जाधव	कार्यकर्ता निलंगा, जिल्हा लातूर	९५२७९८६३०४
१०	भगवान सबन	कार्यकर्ता, अहमदपूर, जिल्हा लातूर	९०९६७३२३५८
११	शेला कहाबडा	जिजामाता सेवाभावी संस्था, अहमदपूर, जिल्हा लातूर	७५०७६८०१०८
१२	अण्णाराव सूर्यवंशी	कार्यकर्ता अहमदपूर, जिल्हा लातूर	२६२३६८२९८२
१३	छाया माधव मकापल्ले	कार्यकर्ता, अहमदपूर, जिल्हा लातूर	९५५२८३२३३६
१४	संजय माधवराव कांबळे	अनार्थ रुरल डेव्हलपमेंट अँड रिसर्च सोसायटी इदगा रोड अहमदपूर	९८६०२०८१४४ kamblesanjay2014@gmail.com
१५	राजेश वसंत कांबळे	अनार्थ रुरल डेव्हलपमेंट अँड रिसर्च सोसायटी इदगा रोड अहमदपूर	८६२५०८९०६६
१६	विभूते संजीव रामलू	भारत नगर, मुळज रोड उमरगा, ता. उमरागा, जि. उस्मानाबाद	९९२२०२०३८० baliram@negfire.org
१७	लक्ष्मण गंगाराम विभूते	शिवाजी नगर, निलंगा, ता. निलंगा जि. लातूर	९८८९६९९५२०
१८	अरविंद उत्तमराव वोल्हाळ	बूक कॉलनी, ता. निलंगा जि. लातूर	८६२६०६३५४९
१९	संजय रामराव चुरमले	अहिल्यादेवी होळकर नगर, अर्वी ता.जि.लातूर	९०४९४८८७०५
२०	माया कवडे	संघर्ष महिला सेवा भावी संस्था	९७६३९६६४०५

अनु	उपस्थितांची नावे	संस्थेचे नाव व पत्ता	भ्रमण ध्वनी क्रमांक व इमेल
२१	साईनाथ आमले	औराद (शहा) जिल्हा लातूर	९४०४०३०२३३
२२	बदगे गुंडेराव	ताडमुगळी, जि. लातूर	८२७५५९८५६२
२३	अंकुश आमले	औराद (शहा) जिल्हा लातूर	९७६४८१३७३१
२४	महेश आमले	औराद (शहा) जिल्हा लातूर	९७६४८१३७३१
२५	राकेश सिंह	एन.ई. जी. फायर, नवी दिल्ली	९८६८६३७३३७
२६	बळीराम बाळसराफ	एन.ई. जी. फायर, नवी दिल्ली	९९८१९९४७७४ baliram@negfire.org
२७	करिश्मा गुप्ता	एक्शन एड, बांद्रा, मुंबई	९८२०५७५३८७ karishma.gupta@actionaid.org
२८	अँथनी डायस	झेविअर सामाजिक संशोधन आणि विकास संस्था, मुंबई	anthonyda@gmail.com
२९	प्रोफेसर आर. शिवा प्रसाद	युनिवर्सिटी ऑफ हैद्राराबाद	९८४८४९७६६५ sivaprasad53@gmail.com
३०	डॉ. सविता स्मिता चव्हाण	भूगोल विभाग, मुंबई विद्यापीठ	९९६९६७८७३७ savi.smita@gmail.com
३१	डॉ. बी.बी. सोनुले	भूगोल विभाग, मुंबई विद्यापीठ	९७०२६४५४१५ bsonule@gmail.com
३२	आय.आर. जयलक्ष्मी	नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिवर्सिटी,बंगलोर	७४११९७९६४४ irjaya175@gmail.com
३३	समीर पांडे	इंटेर्विदा, खार (प) मुंबई	८४६९२४४१५६ sameer.pandey@intervida.org
३४	दत्ता आर. ढवळे	अहमदपूर, जि. लातूर	९३२०५५६६६२
३५	मिलिंद सोनुणे	चिंच भवन, वर्धा रोड	९४२१७७७३७२
३६	अनिस औबडे	टी.आय.एस.एस., मुंबई	९९२२८६९१९१
३७	दिपाली विघे	टी.आय.एस.एस., मुंबई	९८१९८९३०१८
३८	अनंत कदम	विकास सहयोग प्रतिष्ठान, मुंबई	९८६९२२३४१०
३९	बाळकृष्ण रेणके	एस.डी.आर.आय. सोलापूर	९४२२४५७४७१
४०	अभिषेक सिंग	एन.एस.एस. कार्यकर्ता	९८३३७३३५६३
४१	बी.आर.इदाते	अध्यक्ष, राष्ट्रीय भटके विमुक्त आयोग, नवी दिल्ली	dadaidate8@gmail.com
४२	सोनिया जॉन	एन.एस.एस. कार्यकर्ता	७७५६८८९८०९
४३	विरेंद्र धोटे	सीआयडीए	८९८३३४८६६२
४४	डॉ. नारायण भोसले	इतिहास विभाग, युनिवर्सिटी ऑफ मुंबई	९८२२३४८३६१ bhosalenr@gmail.com
४५	अजयदेव सिंग	उपसचिव, सामाजिक न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली	९८१८०७०५८८ aujender.singh@upc.in

अनु	उपस्थितांची नावे	संस्थेचे नाव व पत्ता	भ्रमण ध्वनी क्रमांक व इमेल
४६	धनराज बिराजदोन	परिवर्तन बी.स. संस्था	९७६४५९११३३ dhanrajbirajdar@yahoo.com
४७	दादा दडस	टी.आय.एस.एस., मुंबई	९८९२७६३९६० dadatiss@gmail.com
४८	द.न. भंडाळकर	टी.आय.एस.एस., मुंबई	९८८१५०८०८०
४९	उत्तम मोडक	टी.आय.एस.एस., मुंबई	९९७५७२०५०२ uttam.modak@gmail.com
५०	मिलोन द शर्मा	नाथपंथी डावरी गोसावी कार्यकर्ता	९८६९६९१९०३
५१	अंकुश शिंदे	नाथपंथी डावरी गोसावी कार्यकर्ता	९७०२१४७३९८
५२	कालिदास शिंदे	टी.आय.एस.एस., मुंबई	९८३३८८६०३७
५३	प्रगती जेकेल	परिवर्तन बी.स. संस्था	७७५५९५०२६३ jekellpragati@gmail.com
५४	रमा भोसले	परिवर्तन बी.स. संस्था	९९२२७७९८९७
५५	विनोद राजपूत,	झी न्यूज, २४ तास	८१०८९५३१०५
५६	मलाले व. म.	पब्लिक रिलेशन ऑफिस, मुंबई विद्यापीठ	९८६९७९००६६
५७	पल्लवी रेणके	लोकधारा, सोलापूर	९४२२४५७१७० pallavirenke@gmail.com
५८	हरिभाऊ राठोड	आमदार, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई	९९२०७१६९९९
५९	प्रविण दाभोळकर	मी मराठी लाईव	९७७३७७०५०७
६०	जॉनसन पायस	झेविअर समाज संशोधन संस्था	९००४०६९९२४
६१	धनाजी क क	राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ	dhanaji91@gmail.com
६२	हणमंत ए वानोले	राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ	९८६७६०२१४२ hanmantwanole@gmail.com
६३	डॉ. गजापल इंगोळे	प्रसंग संस्था, वाशिम	९७६५७०६६२८ prasangtrust@gmail.com
६४	सुनिल जावने	जावने शिक्षण स्ट्रस्ट, अंबरनाथ, ठाणे	९३२२२५६८१८
६५	तसलीम	एन.एस.एस. कार्यकर्ता	taselimshikalgar26@gmail.com
६६	सुनिता ल. यादव	एन.एस.एस. कार्यकर्ता	saritay071@gmail.com
६७	डॉ. स्वाती बॅनर्जी	टी.आय.एस.एस.मुंबई	९८३३३९९७२४ sbanerjee@tiss.edu
६८	डॉ. गौतम गवळी	संचालक, आय.सी.एस.एस.आर	gautamgawali@rediffmail.com
६९	वेंकटेश कृष्णा	एन.ई. जी.	vengatesh@negfire.org
७०	डॉ. चंद्रकांत पुरी	मुंबई विद्यापीठ	९८१९०५६४४४ chandrakant.puri@gmail.com

राजीव गांधी समकालीन अध्ययन केंद्र
मुंबई विद्यापीठ,
राजीव गांधी भवन
संस्कृत भवना जवळ
सांताक्रूज (पूर्व) मुंबई ४०० ०९८
दूरध्वनी क्रमांक :
०२२ :२६५४००४० /९८१९०५६४४४
E-mail : chandrakant.puri@gmail.com